**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,१९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास विहित कालावधीत मंजूरी देण्याबाबत. तसेच गट-अ व गट-ब मधील राजपत्रित अधिकारी यांच्या बाबतीत प्रशासकीय विभाग स्तरावर निलंबन आढावा समितीचे गठण.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मविसे-२०१५/प्र.क्र-२१/आस्था-२**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१**
**तारीख: ११ मार्च, २०१५**

वाचा-

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक निप्रआ-१११११/प्र.क्र-८६/११- अ, दिनांक १४ ऑक्टोबर, २०११.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अभियो-१३१२/प्र.क्र-३०/पूर्नबांधित-१, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३.
३) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अभियो-१३१४/प्र.क्र-८६/११-अ, दिनांक ३१ जानेवारी, २०१५.

प्रस्तावना-

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ४ मधील, पोटनियम ५ खालील खंड (क) मधील परंतुकानुसार शासकीय कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल तर अशा प्रकरणांमध्ये निलंबित कर्मचाऱ्यांच्या निलंबन आदेशात फेरबदल करण्यापूर्वी वा तो रद्द करण्यापूर्वी शासनाने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करुन घ्यावी, अशी तरतूद विहित करण्यात आली आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १४.१०.२०११ अन्वये गट-अ व गट-ब मधील कर्मचाऱ्यांसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "निलंबन आढावा समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर आदेशान्वये निलंबन आढावा समितीची बैठक दर तीन महिन्यांनी घेण्याबाबत आणि समितीची शिफारस मा.मुख्यमंत्री यांना सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४.१०.२०११ मधील २ (i) येथील मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीऐवजी संबंधीत प्रशासकीय विभागाच्या अ.मु.स/प्र.स/सचिव यांच्या अध्यक्षतेखाली, त्या त्या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील राजपत्रित गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांच्या निलंबन विषयक प्रकरणांचा आढावा घेण्याबाबत मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांचे स्तरावर "निलंबन आढावा समिती" गठीत करण्यात यावी, अशा सुचना संदर्भाधिन क्रमांक-३ येथे नमुद शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय-

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४.१०.२०११ मधील २(i) येथील मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीऐवजी ग्रामविकास विभागाच्या अ.मु.स/प्र.स/सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागातील गट-अ व गट-ब संवर्गातील राजपत्रित अधिकाऱ्यांचे निलंबन विषयक प्रकरणांचा आढावा घेण्याबाबत खालीलप्रमाणे "निलंबन आढावा समिती" गठीत करण्यात येत आहे:-

**गट-अ व गट-ब कर्मचाऱ्यांबाबत प्रशासकीय विभाग स्तरावरील निलंबन आढावा समिती**

| | | |
|---|---|---|
| **१**)अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(ग्राम विकास व पंचायत राज) (ग्राम विकास व जलसंधारण विभाग) | .. | अध्यक्ष |
| २)अतिरिक्त पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | .. | सदस्य |
| ३)सह सचिव/उप सचिव, (गृह विभाग) | .. | सदस्य |
| ४)सह सचिव/उप सचिव, (ग्राम विकास व जलसंधारण विभाग) (विभागीय चौकशी) | .. | सदस्य सचिव |

२. या समितीने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३१.१.२०१५ मधील परिच्छेद-५ मधील कार्यपध्दतीचे पालन करुन निलंबित अधिकाऱ्यांच्या प्रकरणांचा आढावा घ्यावा, निलंबन करण्यास अथवा मागे घेण्यास सक्षम प्राधिकारी यांना सदर समितीने आपल्या शिफारशी सादर कराव्यात. तद्नंतर निलंबित शासकीय सेवकास सेवेत पुन:स्थापित करणे व अकार्यकारी पदावर नेमणूक करणे या संदर्भातील शासन सुचनांनुसार कार्यवाही करावी.

३. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झालेल्या व विभागाकडे ९० दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित असलेल्या अभियोग मंजूरीच्या प्रकरणांचा, निलंबित अथवा निलंबनाशिवाय पुन:स्थापना/नेमणुक करतांना अकार्यकारी पदावर नियुक्ती आहे किंवा कसे याची तपासणी करणे आणि लाचलुचपत/फौजदारी प्रकरणात न्यायालयाने शिक्षा केलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे या बाबींचा आढावा घेऊन संबंधितांना जलद निपटारा करण्याबाबत कार्यवाही करावयाच्या सूचना समितीने द्याव्यात.

४. क्षेत्रिय स्तरावरील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांबाबत अभियोग दाखल करावयाच्या प्रलंबित प्रकरणाचा उपरोक्त नमुद समितीने, वेळोवेळी आढावा घ्यावा व त्यासंदर्भातील अहवाल मुख्य सचिव तसेच अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांना पाठविण्यात यावा.

५. वरील सुधारणांव्यतिरिक्त शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४.१०.२०११ व दिनांक १२.२.२०१३ मधील अन्य तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेली नाही, त्या तरतुदी तशाच लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३१११७०३३२३८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHINDE VIJAY DATTATRAYA

Digitally signed by SHINDE VIJAY DATTATRAYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD,CID - 917064, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SHINDE VIJAY DATTATRAYA
Date: 2015.03.11 18:01:04 +05'30'

(वि. द. शिंदे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
४. शासनाचे मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
५. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
६. महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.
७. प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक.
८. विभागीय आयुक्त, कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
१०. कक्ष अधिकारी (आस्था-१२), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१,
११. निवड नस्ती.